नि.दि.दा.क्र ५०/२०२१
प्रमिला वि. मुनेश्वर
नि.क्र.१६ खाली

**वादीचा साक्षीदार क्र. १ प्रमिला बबन कोलते**

**वादीतर्फे साक्षीदार क्र. १ चा सरतपास वादीचे विद्वान वकील श्री.मने यांचे मार्फत:-**

मी दाखल केलेल्या माझे शपथपत्रामधील मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीला असुन तो खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. मी अभिलेखावर खालील दस्ताऐवज दाखल केले आहेत.

१. दावा मिळकतीची अधिकार अभिलेखपंजीची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.१७** देण्यात येत आहे.

२. दावा मिळकतीचा बंदोबस्त खसराची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.१८** देण्यात येत आहे.

३. भूमापन क्र. २२ किन्हाळा या मिळकतीच्या ७/१२ उताऱ्याची व गावनमुना ८-अ ची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्यास अनुक्रमे **नि.क्र. १९ व २०** देण्यात येत आहे.

४. गट नं. २२ च्या नकाशाची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र. २१** देण्यात येत आहे.

५. दावा मिळकतीच्या फेराफार पंजीची प्रमाणीत प्रती दाखल केल्या आहेत. त्यास अनुक्रमे **नि.क्र.२२ व २३** देण्यात येत आहे.

६. जुना भूमापन क्र.२४ चा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्याची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.२४** देण्यात येत आहे.

७. दि.०९.०८.२०२१ च्या मिळकतीच्या बक्षीपत्राची प्रमाणित प्रत. त्यास **नि.क्र.२५** देण्यात येत आहे.

८. मी दि. १८.०८.२०२१ रोजी वकीलांमार्फत प्रतिवादीला पाठविलेल्या नोटीसची स्थळप्रत दाखल केली आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर वकीलांची सही आहे. त्यास **नि.क्र.२६** देण्यात येत आहे.

९.   प्रतिवादीला पाठविलेल्या नोटीसीबाबत पोष्टाच्या पावत्या दाखल केल्या आहे. त्यास अनुक्रमे **<u>नि.क्र २७ व २८</u>** देण्यात येत आहे.

१०.   प्रतिवादीला नोटीस मिळाल्याबाबतच्या पोहचपावत्या दाखल केल्या आहे. त्यास अनुक्रमे **<u>नि.क्र २९ व ३०</u>** देण्यात येत आहे.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**प्रतिवादी व त्याच्या वकीलांचा वांरवार पुकारा केला असता गैरहजर. साक्षीदाराचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

**फेरतपास– नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत,** **समक्ष,**

**दिनांक १५.०१.२०२४**

**(जा. म. मिस्त्री)**
**सह.दि.न्या.(क.स्तर),उमरेड**